


# डॉ. ज्योतिष मित्र मिलिंद (पुणे)

## ज्योतिष अभ्यास, मार्गदर्शन आणि समुपदेशन

संपर्क : ७०५८११५९४७ वेब : www.jyotishmitramilind.in

राशी चक्रातील १२ राशींचे वर्गीकरण व प्रभाव (भाग २)

नमस्कार,

राशी वर्गीकरण भाग १ मध्ये आपण राशींचे १३ विभागात केलेले वर्गीकरण व सकारात्मक व नकारात्मक राशि, उतरी व दक्षिणी, विषुवीय, अयन वृत्तिय राशि याचेबद्दल माहिती घेतली. भाग २ मध्ये आपण अग्नी, पृथ्वी, वायु, जल राशि या बद्दल माहिती घेणार आहोत.

(३) अग्नी, पृथ्वी, वायु, जल राशि :

राशीचक्रातील १२ राशींना चार तत्त्वांनुसार विभागले आहे.

जागतिक ज्योतिषी एलन लियो च्या मते अग्नी तत्व आत्मा व चेतन शक्ती, पृथ्वी तत्व पार्थिव शरीर, वायू तत्व नदी स्थानापासून मेंदू पर्यंत, जलतत्व ईश्वर ज्याच्यामुळे जन्म संभवतो हे दर्शवते.

मेष, सिंह, धनु या अग्नितत्वाच्या राशी आहेत.

वृषभ, कन्या, मकर या पृथ्वी तत्वाच्या राशी आहेत.

मिथुन, तुळ, कुंभ या वायुतत्वाच्या राशी आहेत.

कर्क, वृश्चिक, मीन या जलतत्वाच्या राशी आहेत.

| क्र. | वर्गीकरण | राशी | वर्णन |
|---|---|---|---|
| १ | अग्नी राशि | मेष, सिंह, धनु | अग्नी राशी या क्रियाशील व अत्यंत उत्साही, दृढ, स्वतंत्र, साहसी असतात. हे गतिविधी, महत्वाकांक्षा, प्रभावशक्ति, दबाव, चैतन्य दाखवते. लग्न स्थानी अग्नितत्वाची रास असेल तर ती व्यक्ती गर्वपूर्ण, साहसी, वर्चस्व ठेवणारी, दुस-याचा अनुयायी होण्यापेक्षा नेतृत्व करणारी असते. ती व्यक्ती तार्किक व आत्मविश्वासू असते. जातक तीक्ष्ण व सुगम बुद्धीचा असतो. दुसर्याचे न ऐकता स्वत:च्या बुद्धीनुसार व आत्मबळाने कार्य करेल. अग्निराशीं लग्न जातकांना ताप, जळजळणे, अचानक तापाने आजारी पडणे फार कमी वेळेसाठी |

| | | | |
|---|---|---|---|
| | | | असते.<br>पश्चिमी ज्योतिषानुसार अधिकांश ग्रह अग्नी राशि मध्ये असतील, तर तो प्रभावशील, शक्तिवान, उर्जायुक्त, व जाताकांस यांत्रिक योग्यतेमध्ये पारंगत करतो. व असे व्यवसाय दर्शवितो ज्यामध्ये धातु व अग्निचा प्रयोग होतो. उदा. डाग देणारे, जोडणारे, माशिनिस्ट, इंजिनियर, लोहार, सुतार, न्हावी, कसाई, शल्य चिकित्सक ई. हा धाडसी व भयावह व अत्यधिक गतिशील धंदे दर्शवतो. |
| २ | पृथ्वी राशि | वृषभ, कन्या, मकर | पृथ्वी राशि या स्थूलता व स्थिरता दर्शवतात.या भौतिक कल्याण दर्शक आहेत. जातक धन शक्ति व सन्मान प्राप्त करण्याचा प्रयत्न करतो. पृथ्वी राशि लग्नस्थानी असेल तर उत्तम स्वास्थ्य राहते. तो सावधान संचेत, दूरदर्शी, चतुर व व्यवहारिक, गुप्तता राखणारा, शंकाळू, हट्टी, आत्मरक्षक,अल्पखर्चिक व नीट विचार करून कार्य करणारा, उद्योगी व व्यवसायी असतो. जातक प्रायोगिक विधीपूर्वक व भौतिकवादी असतो. जर अधिकांश ग्रह पृथ्वीराशीत असतील तर चांगला व्यापारी होतो.<br>श्री एल. जार्ज म्हणतो हे जातक शीघ्र घाबरण्याची प्रवृत्ति, आरामहीन, दु:खी व व्यतिथ, विशेषत: संधिवात, वायु विकार, क्रानिक विकृतिने त्रस्त असतात. पार्थिव राशि वाले व्यक्ति व्यापार, व्यवसाय, भवन निर्माण, खाण व ज्यामध्ये कष्टाची व संयमाची आवश्यकता असते असे अधिक परिश्रम करणारे व हळू होणारे कार्य करणारे असतात. कन्या रास रसायना करिता, वृषभ राशी कृषि व वित्त, मकर रास प्रशासकीय अथवा राजनैतिक स्थिति दाखवितात. कोणी व्यक्ति कृषि, बगीचे, खोदकाम, लाकूड कापणे, भवन संबंधी सामुग्रीच्या व्यवसायामध्ये असू शकतो. अथवा जेवण सामग्री, तयार पदार्थ विकणारा ठेकेदार अथवा व्यापारी उदा. रेस्टारन्ट, धान्य व्यापारी, ई. त्यो पोशाख, सामान व कपड्याचा व्यापारी असू शकतो. |
| ३ | वायु राशि | मिथुन, तुळ, कुंभ | वायु राशि या विशेष रूपाने मन व मेंदू संबंधित अनुभवाशी संबंधित असतात. हा कमी चेतनावाल्या राशि असतात. जर या राशीशी ग्रह व स्थानांचा शुभ संबंध असेल, तर प्रसन्नचित्त, सभ्यता, रमणीयता, नम्रता, सहानुभूति व मानवतावादी स्वभावाचे असतात. बुद्धि चांगली, उत्तम कल्पनाशक्ति, सर्वज्ञाता व फलदायी हे गुण दिसतात. सुसंस्कृत, संगीतमय, जिज्ञासु, तर्कशील, सामान्यपणे सद्व्यवहारी व समतोल प्रवृति चा असू शकतो. चीकातपणे काम करण्यापेक्षा युक्तीने काम साधणारा असतो.<br>वायुराशि मध्ये जन्म घेणार्यांचे रक्ताभिसरण चांगले असते. शरीर स्थूल असू शकते, पण चेहरा उत्तम असेल. सर्व गोष्टीची माहिती ठेवणारा, विस्तृत व सजग कार्यकर्ता असतो. हया राशिमध्ये उत्पन्न व्यक्ति अधिक परिश्रमी असतील, |

| | | | |
|---|---|---|---|
| | | | अधिक थकतील व अधिक परिश्रमामुळे नाही संबंधी पीड़ा उत्पन्न होईल.<br>वायुराशि बुद्धिमान लोक दर्शवतात. जातक एक कुशल परामर्शदाता असतात. ते वापल्या चतुरपणामुळे काही साहित्यिक व्यवसाय दाखवितात. वैज्ञानिक गोष्टी लाभदायक असतील. कोणताही व्यवसाय ज्यामध्ये शरीरापेक्षा मन व डोक्याचे काम असेल तो यांचे करिता योग्य असेल. हे आदर्श अकाउन्टन्ट, पुस्तक ठेवणारे, कवि, कादंबरीकार, वकील, कलाकार, रिपोर्टर, व्याख्याता, वैज्ञानिक, वायुयान, चालक, अन्वेशक हत्यादि असू शकतात.<br>वायू राशीत अधिक ग्रह असल्यास तो बुद्धिमान, आधुनिक, दयाळू, आदर्शवादी व फार चंचल असतात. जातक कलाकार व साहित्यकार असतील. |
| ४ | जल राशि | कर्क, वृश्चिक, मीन | जल राशि या फलदायक प्रवृत्तिच्या व चांगली कल्पनाशक्ती असलेल्या असतात. आरोग्यासंबंधी कमी ऊर्जाशक्ति दर्शवतात. शरीर रचना कमजोर असेल. प्रकृति आळशी व कार्य करण्याची अनिच्छा असू शकते. यांचे मन भावुक, चिंतायुक्त, कोमल, हृदय व भावनाप्रधान असते. या राशि रहस्यमय प्रवृत्ति दाखवितात. एलन लियो म्हणतो की, जल तत्व राशि कमी भाग्यशाली व भावुकतावादी व शक्तिहीन असते .जेव्हा अधिकांश ग्रह जलराशि मध्ये स्थित असतात, तेव्हा व्यक्ति लज्जायुक्त, भावूक, भयपूर्ण, अध्यात्मिक व कमी शक्तिवान असतात. जर जल राशि पीड़ित असेल, तर ती व्यक्ति कमी रक्त असलेली व नाडी कमजोर असते. उतार वयामध्ये गाठ, अथवा कर्क रोग ई. आजारांने ग्रस्त होऊ शकतो. जर लग्न स्थानी जलराशि असेल, तर त्यास कमी आंतरिक शक्ति दर्शवते. कमी पाचन शक्ति, संधी रोग, सर्दी, खोकला, ई. संबंधी कष्ट प्राप्त होतात.<br>जल राशि द्रव पदार्थ, अधिक असलेले व्यवसाय करते. या मध्ये पाणी, स्पिरीट, कपडे धुण्यापासून ते पोहण्या पर्यन्त सर्व व्यवसाय येतात. पोहणे, मासे पकडणे, जहाज निर्माता व व्यापारी असतो. पाणी हेमुख्य तत्व आहे, नेव्ही, समुद्र सफर ई. असू शकतो. नरम वस्तूंचा व्यापार, सुती दोरा, रासायनिक ई. हे सर्व जालाराशीचा प्रभाव आहे. जल राशि मध्ये अधिकाधिक ग्रह असल्यास ते भावनाप्रधान असतात. स्वाभाविक पणे खूप सावधानी बाळगतात.भावुकतेच्या प्रभावात असले तरी ते साधारण मध्यममार्गी असतात. |